FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED
(A Government of Maharashtra Enterprise)
विभागीय व्यवस्थापक, चंद्रपूर वप्रवि. एफडीसीएम लिमी. चंद्रपूर यांचे कार्यालय
तथास्तु इमारत, रामबाग वनवसाहत, मुल रोड, चंद्रपूर-४४२४०१
दुरध्वनी क्रं. 07172-255741 Email Id :- westchandafdcm@yahoo.com

:: निरुपयोगी भगांर, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची जाहिर खुल्या लिलाव पध्दतीने विक्री ::

वनविकास महामंडळातील निर्लेखीत वाहने, भगांर, लोखंडी साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची जाहिर खुल्या निविदा पध्दतीने विक्री करणेकरीता लॉट लावण्यात आलेल्या जागेवर आहे त्या परीस्थीतीत जाहीर खुला लिलाव दि. 25/11/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता ते लिलाव संपेपर्यंत (परिक्षेत्र – लोहारा, मामला, जुनोना व चिचपल्ली) चंद्रपुर वन प्रकल्प विभाग, चंद्रपुर येथील लोहारा रोववाटीका, लोहारा परिक्षेत्र येथे घेण्यात येत आहे. तसेच दिनांक 26/11/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता ते दुपारी 01.00 वाजेपर्यंत (परिक्षेत्र – आरागिरणी/सिड युनिट, बल्लारशाह) चंद्रपुर वन प्रकल्प विभाग, चंद्रपुर येथील आरागिरणी/सिड युनिट, बल्लारशाह परिक्षेत्र येथे घेण्यात येत आहे. तसेच दिनांक 26/11/2026 रोजी दुपारी 02.00 ते लिलाव संपेपर्यंत (परिक्षेत्र – झरण व कन्हारगांव) चंद्रपुर वन प्रकल्प विभाग, चंद्रपुर येथील झरण रोपवाटीका, झरण व कन्हारगांव परिक्षेत्र येथे घेण्यात येत आहे. परिक्षेत्रातील निर्लेखीत वाहने, भगांर, लोखंडी साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याचे लॉट लावण्यात आलेल्या जागेवर आहे त्या परीस्थीतीत जाहीर खुल्या निविदा पध्दतीने विक्री करण्यात येत आहे. तरी ईच्छुक खरेदीदारांनी दिलेल्या वेळी व स्थळी उपस्थित राहावे.

टिप :-

1. ईच्छुक खरेदीदारांना नमुद निर्लेखीत साहित्य चंद्रपुर वन प्रकल्प विभाग, चंद्रपुर अंतर्गत येत असलेल्या परिक्षेत्र लोहारा, जुनोना, चिचपल्ली, मामला, आरागिरणी/सिड युनिट, बल्लारशाह, झरण, कन्हारगांव परिक्षेत्राच्या भुखंडावर कार्यालयीन वेळेत पाहता/बघता येतील.
2. विक्री करीता ठेवण्यात आलेले निर्लेखीत भंगार साहित्याची यादी, अटी व शर्ती www.fdcm.co.in या संकेतस्थळावर पाहता/बघता येईल.
3. अधिक माहितीकरीता कार्यालयीन दुरध्वनी क्र. 07172-255741 या वर सपंर्क साधावा.

विभागीय व्यवस्थापक,
चंद्रपुर वन प्रकल्प विभाग,
चंद्रपुर

"वनांचा समग्र विकास हाच आमचा ध्यास"

FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED
(A Government of Maharashtra Enterprise)
विभागीय व्यवस्थापक, चंद्रपूर वप्रवि. एफडीसीएम लिमी. चंद्रपूर यांचे कार्यालय
तथास्तु इमारत, रामबाग वनवसाहत, मुल रोड, चंद्रपूर-४४२४०१
दुरध्वनी क्रं. 07172-255741 *Email Id :- westchandafdcm@yahoo.com*

निरुपयोगी/निर्लेखित वाहने, भंगार, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याचा जाहिर लिलाव पध्दतीने विक्री करावयाच्या अटी व शर्ती

1. विक्रीकरीता ठेवण्यात आलेल्या निरुपयोगी लोखंडी भंगार, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याचे वर्णन निम्नहस्ताक्षरकर्ता अधिकारी यांचे माहितीनुसार बरोबर आहे. विक्रीकरीता ठेवण्यात आलेली भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्य "आहे त्या स्थीतीत" "आहे त्या ठिकाणी" विक्रीस ठेवण्यात आले आहे. इच्छुक खरेदीधारकांनी भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची प्रत्यक्ष तपासणी करुन भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची वर्णन इत्यादी बरोबर/खरे असल्याबाबत स्वत: खात्री करावी. निरुपयोगी भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची पाहणी/तपासणी खुल्या लिलावापुर्वी कार्यालयीन वेळेत करता येईल. विक्रीस ठेवलेल्या निरुपयोगी भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची चुकीचे वर्णन देण्यात आले या सबबीवर किंवा इतर कोणत्याही कारणास्तव विक्री रद्द करता येणार नाही व कसलीही नुकसान भरपाई देता येणार नाही.
2. खुल्या लिलावात सहभाग घेण्यासाठी लिलावाचे दिवशी किमान 1000/- रक्कम EMD स्वरुपात भरणे आवश्यक आहे. त्यानंतरच बोली स्विकारली जाईल.
3. वैयक्तीक खरेदीदारास भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची खुल्या लिलावात भाग घेण्यापुर्वी आधार कार्ड, पॅन कार्ड, ईत्यादी दस्ताऐवजाची सत्यप्रत EMD स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याकडे जमा करणे अनिवार्य आहे.
4. Firm अंतर्गत भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची खुल्या लिलावात भाग घेणारे खरेदीदारास खुल्या लिलावात भाग घेण्यापुर्वी आस्थापणा नोदंणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जिएसटी प्रमाणपत्र, ओळखपत्र, ईत्यादी दस्ताऐवजाची सत्यप्रत EMD स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याकडे जमा करणे अनिवार्य आहे.
5. खरेदीदाराने EMD फॉर्मवर स्वत:चा पोष्टाचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता लिहणे आवश्यक आहे. पत्यात काही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती त्वरीत या कार्यालयांस देणे बंधनकारक राहील.
6. खरेदीदाराने खरेदी केलेल्या किंमतीच्या 25% रक्कम अनामत रक्कम म्हणुन (E.M.D.) बँक ड्राफ्ट/ RTGS/Pay Order चे स्वरुपात जोडणे आवश्यक आहे. किंवा लिलावाचे EMD ही रोख स्वरुपात स्विकारल्या जाईल.
7. कोणतेही कारण न दर्शविता विक्रीसाठी ठेवलेली निरुपयोगी भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची कोणत्याही क्षणी विक्रीतुन काढुन टाकण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम लिमीटेड, चंद्रपुर वनप्रकल्प विभाग, चंद्रपुर यांनी राखुन ठेवलेला आहे.
8. खरेदीदाराने माल खरेदी केल्यानंतर त्यास सर्व अटी व शर्ती मान्य आहेत असे समजण्यात येईल.
9. यशस्वी खरेदीदाराने अनामत रक्कमेच्या समायोजनेनंतर उर्वरीत विक्री रक्कम, जी.एस.टी., आयकर अधिनियमान्वये Income-Tax Act. 2025 चे तरतुदीनुसार Code No. 1073 अन्वये आयकर (2%) व जी.एस.टी. ॲक्ट 2017 प्रमाणे GST Tax (18%) तसेच इतर सर्व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा खरेदीदाराची बोली मंजुर झाल्याचे तारखेपासुन 30 दिवसांचे आंत भरणा करणे बंधनकारक आहे.

त्यानतंर 31 ते 45 दिवसापर्यंत 18% प्रती साल प्रती शेकडा प्रमाणे व्याज आकारण्यात येईल. 46 ते 60 दिवासापर्यंत 18% प्रती साल प्रती शेकडा व्याज दर 10% शिल्लक रक्कमेवर दंड आकारण्यात येईल. 60 दिवासापर्यंत खरेदीदारांनी सपुंर्ण रक्कमेचा भरणा न केल्यास त्यांनी खरेदी केलेले गट हे जप्त करण्यात येईल. तसेच त्यांनी जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. सर्व देय रक्कमेचा भरणा बँक ड्राफ्ट/RTGS/Pay Order चे स्वरुपात विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम लिमीटेड, चंद्रपुर वनप्रकल्प विभाग, चंद्रपुर यांचे नांवाने चंद्रपुर येथील कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेवर काढलेला असावा.

10. जर यशस्वी खरेदीधारक विहीत मुदतीत मंजुर रक्कमेचा म्हणजे विक्री रक्कम, जी.एस.टी., व इतर अनुज्ञेय कर/आयकर ई. पुर्ण देय रक्कमेचा भरणा करण्यास असमर्थ ठरला तर विभागीय व्यवस्थापक, चंद्रपूर वनप्रकल्प विभाग, चंद्रपूर यांना एफडीसीएम लिमीटेडने प्रदान केलेल्या अधिकार व शक्तीनूसार अशा खरेदीधारकांची स्वीकारलेली बोली रद्द करण्यात येईल व अशा खरेदीधारकांची जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व नमुद केलेली मालमत्ता पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल. पुर्नविक्रीमध्ये वनविकास महामंडळास जर काही नुकसान झाले तर त्याची जबाबदारी पहिल्या यशस्वी खरेदीधारकांवर राहील व नुकसानीची रक्कम थकीत राजस्व म्हणुन त्यांचेकडुन वसुल करण्यात येईल. अशी थकीत रक्कम भरणा करणेबाबत नोटीस प्रेषित केल्यापासुन 15 दिवसांचे आंत या कार्यालयांत जमा करणे बंधनकारक राहील. जर विहीत मुदतीचे आत थकीत रक्कमेचा भरणा न केल्यास प्रचलित दरानुसार व्याज रक्कम आकारण्यात येवुन अशा सर्व रक्कमेचा भरणे करणे पहिल्या खरेदीधारकांवर कायदेशिररित्या बंधनकारक राहील. मात्र पुर्नविक्रीत काही नफा झाल्यास त्यावर पहिल्या खरेदीधारकांचा कोणताही हक्क/दावा राहणार नाही.

11. यशस्वी खरेदीदारकास विक्री मंजुर झालेल्या तारखेपासुन कमाल 30 दिवसाच्या आत सर्व विक्री किमंत व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा करुन नमुद केलेल्या निरुपयोगी भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची उचल करावी लागेल. 31 ते 60 दिवासाच्या आत उचल करावयाची झाल्यास शिल्लक असलेल्या रक्कमेवर वर नमुद केल्याप्रमाणे व्याज व दंडासह खरेदीधारकास खरेदी किंमतीच्या 2.5% जागेचे भाडे (Ground Rent) भरावे लागेल. त्यापुढिल 30 दिवसाची मुदतवाढ प्रादेशिक व्यवस्थापक, एफडीसीएम लिमी. चंद्रपुर प्रदेश, चंद्रपुर देवु शकतील. त्यासाठी विक्री किंमतीच्या 5% पेक्षा अधिक जागेचे भाडे असणार नाही. एवढी रक्कम जागेचे भाडे भुर्दंड म्हणुन खरेदीदारास आगावु भरावी लागेल. खरेदी किंमत तसेच जागेचे भाडे ईत्यादीसह देय रक्कमेचा पुर्ण भरणा केल्यानतंरच खरेदीदारास खरेदी केलेल्या वस्तुचा ताबा देण्यात येईल.परंतु मुदतवाढीकरीता मुदत संपण्याची किमान 5 दिवसाच्या आधी अर्ज करावा लागेल. मुदतीपुर्वी अर्ज प्राप्त न झाल्यास सदर अर्जावर कोणताही विचार केल्या जाणार नाही. त्यानंतर खरेदीदाराचा सदर गटावर कोणताही अधिकार राहणार नाही व विभागीय व्यवस्थापक, चंद्रपूर वनप्रकल्प विभाग, चंद्रपूर हे सदर गट पुर्नविक्रीस ठेवतील.

12. निरुपयोगी भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची उचल (डिलीव्हरी) खरेदीधारक नमुद केलेल्या पुर्ण लॉटप्रमाणे देण्यात येईल. (एक लॉटचे भागाचे प्रमाणात उचल (डिलीव्हरी) देण्यात येणार नाही. (फक्त लोखंडी भंगार साहित्याकरीता लागु)) मात्र यशस्वी खरेदीधारकाने खरेदी केलेल्या संपुर्ण लॉटचे विक्री किंमतीचा व अनुज्ञेय कर रक्कमेचा भरणा केलेला असावा.

13. विक्री केलेल्या मालाची उचल वाहतुक व्यवस्था खरेदीदारास स्वत:चे खर्चाने करावे लागेल.

14. विक्री केलेल्या मालाची उचल (डिलीव्हरी) कार्यालयीन वेळेतच व कार्यालयीन दिवशीच करण्यात येईल. सुट्टीचे दिवशी उचल करु देता येणार नाही.

15. खरेदीदाराने नमुद केलेली रक्कम स्वीकृत केल्यानंतर त्या लॉटची/निरुपयोगी भंगार साहित्य, निवासस्थानाचा मलबा व लाकडी साहित्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत खरेदीदाराची राहील. आग/चोरी/नैसर्गीक आपत्ती ई. कोणत्याही कारणाने विक्री झालेल्या साहित्यास क्षती पोहचल्यास

किंवा नष्ट झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही व त्याची कोणतीही नुकसान भरपाई महामंडळाकडुन देण्यात येणार नाही.

16. खरेदीदांनी खरेदी केलेले वाहन हे भंगार म्हणुन खरेदी करण्यात येईल व भविष्यात ते वाहन रस्त्यावर चालवता येणार नाही याचे प्रमाणपत्र भरुन द्यावे लागेल.

17. या निविदेतील अटी व शर्ती संबंधी उभय पक्षात काही वाद उद्‌भवल्यास मा. प्रादेशिक व्यवस्थापक, चंद्रपुर प्रदेश, चंद्रपूर यांचा निर्णय अंतिम राहील व तो निर्णय उभयतांना बंधनकारक राहील.

विभागीय व्यवस्थापक,
चंद्रपूर वप्रवि,चंद्रपूर

अटीचे मान्यतापत्र

वरील सर्व अ.क्र. 01 ते 17 अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मान्य असल्याबाबत स्वाक्षरी करीत आहे.

खरेदीधारकाची स्वाक्षरी

नाव :-

संपुर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता :-

मोबाईल क्रमांक :-